भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# सशस्त्र दल (जम्मू आणि काश्मीर) विशेष अधिकार अधिनियम, १९९०

(सन १९९० चा अधिनियम क्रमांक २१)

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Armed Forces (Jammu and Kashmir) Special Powers Act, 1990

**(Act No. 21 of 1990)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि आर्मड् फोर्सेस (जम्मू अँन्ड काश्मीर) स्पेशल पॉवर अॅक्ट, १९९० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ २१ ते २२ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**डॉ. सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Armed Forces (Jammu and Kashmir) Special Powers Act, 1990 as on the 31st January, 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 21 to 22.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

DR. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

# सशस्त्र बल (जम्मू आणि काश्मीर) विशेष अधिकार अधिनियम, १९९०

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. क्षेत्रांना अशांत क्षेत्र घोषित करण्याचा अधिकार.
४. सशस्त्र दलाचे विशेष अधिकार.
५. झडतीच्या अधिकारांतर्गत कुलुपे इ. तोडून उघडण्याचा अधिकार.
६. अटक केलेल्या व्यक्ती आणि जप्त केलेली संपत्ती पोलिसांकडे सुपूर्द करणे.
७. या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.
८. निरसन व व्यावृत्ती.

एच ४०६४–२ (१०३५—१–२००४)

## सशस्त्र दल (जम्मू आणि काश्मीर) विशेष अधिकार अधिनियम, १९९०
## (१९९० चा अधिनियम क्रमांक २१)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान)

[१० सप्टेंबर, १९९०]

**जम्मू आणि काश्मीर राज्याच्या अशांत क्षेत्रांमध्ये सशस्त्र दलांच्या सदस्यांना काही विशेष अधिकार प्रदान करण्यासाठी अधिनियम, १९९०.**

भारतीय गणराज्याच्या एक्केचाळिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास, "सशस्त्र दल (जम्मू आणि काश्मीर) विशेष अधिकार अधिनियम १९९०" असे म्हणावे. — संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) याचा विस्तार संपूर्ण जम्मू आणि काश्मीर राज्यावर आहे.

(३) तो, ५ जुलै १९९० रोजी अंमलात आला असल्याचे मानले जाईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "सशस्त्र दल" याचा अर्थ, भूदल म्हणून क्रियाशील असलेले सैनिकदल व वायुदल, असा आहे व त्यात याच प्रकारे कार्य करणाऱ्या संघाच्या इतर सशस्त्र दलांचाही समावेश आहे;

(ख) "अशांत क्षेत्र" याचा अर्थ, कलम ३ खालील अधिसूचनेद्वारे त्या वेळेपुरते अशांत क्षेत्र म्हणून घोषित केलेले क्षेत्र, असा आहे;

(ग) या अधिनियमात वापरण्यात आलेले पण व्याख्या न केलेले आणि वायुसेना अधिनियम, १९५०(१९५० चा ४५) किंवा सेना अधिनियम, १९५०(१९५० चा ४६) मध्ये व्याख्या केलेले इतर सर्व शब्द आणि शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमांमध्ये नेमून दिलेले ते ते अर्थ असतील.

३. जर, जम्मू आणि काश्मीर राज्याच्या संबंधात, त्या राज्याचे राज्यपाल किंवा केंद्र सरकार यांचे असे मत असेल की, ते संपूर्ण राज्य किंवा त्याचा काही भाग, अशा अशांत आणि धोकादायक परिस्थितीत आहे की,— क्षेत्रांना अशांत क्षेत्र घोषित करण्याचा अधिकार.

(क) कायद्याद्वारे स्थापन झालेल्या सरकारला भयाकुल करणे किंवा लोकांमध्ये किंवा लोकांच्या कोणत्याही गटामध्ये दहशत निर्माण करणे किंवा लोकांच्या कोणत्याही गटाला वेगळे करणे किंवा लोकांच्या वेगवेगळ्या गटांतील सामंजस्याचे वातावरण बिघडवणे अशा प्रकारचे उद्दिष्ट असणाऱ्या दहशतवादी कारवायांचा अंतर्भाव असलेल्या कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी ;

(ख) भारताची राज्यक्षेत्रीय एकात्मता आणि सार्वभौमत्व नाकारण्याचे, त्यांना हरकत घेण्याचे किंवा त्याचा भंग करण्याचे किंवा संघराज्यापासून भारताच्या कोणत्याही राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागाचे अभ्यर्पण करण्याचे किंवा भारतीय राज्यक्षेत्रांच्या कोणत्याही भागाला संघराज्यापासून अलग करण्याचे किंवा भारतीय राष्ट्रध्वज, भारतीय राष्ट्रगीत आणि भारताचे संविधान यांचा अपमान करण्याचे उद्दिष्ट असणाऱ्या कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी,

नागरी अधिकाराच्या सहाय्यतेसाठी सशस्त्र दलांचा वापर आवश्यक असेल तर, त्या राज्याचा राज्यपाल किंवा केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, ते संपूर्ण राज्य किंवा त्याचा काही भाग अशांत क्षेत्र म्हणून जाहीर करू शकेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमात "दहशतवादी कारवाई" याला जम्मू आणि काश्मीर राज्यांना लागू असलेल्या भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४८ च्या स्पष्टीकरणात असेल तोच अर्थ आहे.

४. सशस्त्र दलाचा कोणताही राजादिष्ट अधिकारी, वॉरंट अधिकारी, राजादिष्ट नसलेला अधिकारी किंवा समान दर्जाची इतर कोणतीही व्यक्ती, एखाद्या अशांत क्षेत्रामध्ये,— सशस्त्र दलांचे विशेष अधिकार.

(क) जर तिचे असे मत असेल की, सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी असे करणे आवश्यक आहे तर ती, तिला आवश्यक वाटेल अशी ताकीद दिल्यानंतर, जी व्यक्ती अशांत क्षेत्रामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास किंवा हत्यारे किंवा ज्यांचा वापर हत्यार म्हणून होऊ शकतो अशा वस्तू किंवा, अग्निशस्त्र, दारूगोळा किंवा स्फोटक पदार्थ घेऊन जाण्यास मनाई करणाऱ्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे किंवा आदेशाचे उल्लंघन करून कार्य करत असेल अशा कोणत्याही व्यक्तीवर गोळी चालवू शकेल किंवा तिच्या मृत्यूस कारणीभूत होईल एवढा तिच्या विरुद्ध बळाचा वापर करू शकेल ;

(ख) जर तिचे असे मत असेल की, तसे करणे आवश्यक आहे तर ती शस्त्रांच्या अस्थायी गोदामाचा किंवा जेथून सशस्त्र हल्ले केले गेले आहेत किंवा होण्याचा संभव आहे किंवा करण्याचा प्रयत्न झाला आहे अशा तयार केलेल्या किंवा तटबंदी केलेल्या स्थानाचा किंवा आश्रयस्थानाचा किंवा ज्याचा उपयोग सशस्त्र स्वयंसेवकांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी करण्यात येतो अशा स्थानाचा किंवा एखाद्या अपराधाबाबत हव्या असलेल्या टोळ्यांकडून किंवा फरार व्यक्तींकडून लपून राहण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या स्थानांचा नाश करू शकेल ;

(ग) ज्या व्यक्तीने कोणताही दखली अपराध केला आहे किंवा जिच्या बाबतीत असा संशय आहे की, तिने कोणताही दखली अपराध केला आहे किंवा करणार आहे, अशा व्यक्तीला वॉरंटाशिवाय अटक करू शकेल किंवा अटकेसाठी आवश्यक अशा बळाचा वापर करू शकेल ;

(घ) पूर्वोक्ताप्रमाणे अशी कोणतीही अटक करण्यासाठी किंवा चुकीने परिरुद्ध किंवा निरुद्ध केल्याची खात्री असलेल्या कोणत्याही व्यक्तीला परत मिळवण्यासाठी किंवा जिच्याबाबत वाजवीरीत्या असा संशय असेल की, ती चोरीची संपत्ती आहे, अशी कोणतीही संपत्ती किंवा त्या जागेत बेकायदेशीरपणे ठेवल्याचे खात्रीलायकपणे वाटत असेल अशी कोणतीही शस्त्रे, दारूगोळा, किंवा स्फोटक पदार्थ ताब्यात घेण्यासाठी, वॉरंटाशिवाय कोणत्याही जागेत प्रवेश करू शकेल आणि झडती घेऊ शकेल आणि त्या प्रयोजनासाठी आवश्यक अशा बळाचा वापर करू शकेल आणि अशी कोणतीही संपत्ती, शस्त्रे, दारूगोळा व स्फोटक पदार्थ जप्त करू शकेल ;

(ङ) अपराधी म्हणून घोषित केलेली कोणतीही व्यक्ती किंवा जिने बेदखली अपराध केला आहे अशी व्यक्ती किंवा जिने बेदखली अपराध केला आहे किंवा ती करण्याच्या बेतात आहे असा जिच्याबद्दल रास्त संशय असेल अशी व्यक्ती किंवा जिने कोणतीही शस्त्रे, दारूगोळा किंवा स्फोटक पदार्थ बेकायदेशीररीत्या बाळगल्याचा संशय आहे अशी ते पदार्थ घेऊन जाणारी व्यक्ती, यांना वाहून नेण्यात येत असल्याचा त्यांच्याबाबतीत वाजवी संशय असेल अशी वाहने किंवा जलयाने रोखू शकेल, त्यांची झडती घेऊ शकेल किंवा ती जप्त करू शकेल, आणि त्या प्रयोजनार्थ, ती रोखण्यासाठी, झडती घेण्यासाठी किंवा यथास्थिति, जप्त करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा बळाचा वापर करू शकेल.

झडतीच्या अधिकारांतर्गत कुलुपे इ. तोडून उघडण्याचा अधिकार.

५. या अधिनियमान्वये झडती घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, कोणतेही दार, अलमारी, तिजोरी, पेटी, कपाट, खण, पुडके किंवा अन्य वस्तू यांची किल्ली जर रोखून ठेवली असेल तर तिचे कुलुप तोडून उघडण्याचा अधिकार असेल.

अटक केलेल्या व्यक्ती आणि जप्त केलेली संपत्ती पोलिसांकडे सुपूर्द करणे.

६. या अधिनियमान्वये अटक केलेल्या आणि पोलीस कोठडीत ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा या अधिनियमान्वये जप्त करण्यात आलेली प्रत्येक संपत्ती, शस्त्रे, दारूगोळा किंवा स्फोटक पदार्थ किंवा कोणतेही यान किंवा जलयान हे, शक्य तेवढ्या लवकर जवळच्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात येईल व त्यासोबत अशी अटक किंवा यथास्थिति, अशा संपत्तीची, शस्त्रांची, दारूगोळ्याची किंवा स्फोटक पदार्थांची किंवा यथास्थिति, यान अथवा जलयान यांची जप्ती करावी लागल्यामागील परिस्थिती नमूद करणारा अहवालही देण्यात येईल.

या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक कार्य करणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

७. या अधिनियमाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून करण्यात आलेल्या किंवा करावयाचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध, कोणताही अभियोग, दावा किंवा इतर न्यायिक कार्यवाही, केंद्र सरकारच्या पूर्व मंजुरीने असेल त्याव्यतिरिक्त दाखल करण्यात येणार नाही.

निरसन व व्यावृत्ती.

८. (१) सशस्त्र दल (जम्मू आणि काश्मीर) विशेष अधिकार अध्यादेश, १९९० (१९९० चा ३) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कारवाई ही, या अधिनियमाच्या तद्नुरूप उपबंधान्वये केल्याचे किंवा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई